दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक ३३२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२६ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# हनुमान कोळीवाडा पुनर्वसनाच्या प्रश्नावर चर्चेनंतरही आंदोलनावर ठाम

## जेएनपीटी समुद्र चॅनल बंद आंदोलन २६ फेब्रुवारी पासून केव्हाही सुरू करण्याचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

**जेएनपीटी पुनर्वसित वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या फेर पुनर्वसनाच्या प्रश्नावर काल उपजिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामस्थांसोबत झालेल्या बैठकीतही समाधान झाले नसल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी २६ फेब्रुवारी पासून जेएनपीटी समुद्र चॅनल बंद आंदोलन केव्हाही सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती सरपंच परमानंद कोळी यांनी दिली आहे.**

जेएनपीटी पुनर्वसित वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या फेर पुनर्वसनासाठी १७ हेक्टर जमीन मिळावी या मागणीसाठी मागील ३५ संघर्ष सुरू आहे. या ३५ वर्षांच्या संघर्षानंतर जेएनपीटी व जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून हनुमान कोळीवाडा येथील २५६ कुटुंबीयांचे जुन्या फुंडे- जसखार गाव दरम्यान जेएनपीटीच्या मालकीच्या ७१० गुंठा जागेत फेर पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी शासन व हनुमान कोळीवाड्यातील ग्रामस्थांचे एकमत झाले होते. मात्र ७१० गुंठे क्षेत्रावरील विकासाच्या आराखड्यात अनेक त्रुटी निघाल्याने हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी विरोध करत आंदोलनाचा इशारा दिला होता. आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर उपजिल्हाधिकारी राहुल मुंडके यांनी पनवेल येथील कार्यालयात हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांसोबत काल बोलावली होती. या बैठकीस उपजिल्हाधिकारी राहुल मुंडके, हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांसह जेएनपीटी अधिकारी, उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे आदी उपस्थित होते.

या बैठकीत सात हेक्टर जागेवरून १०.०६ हेक्टर जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. या प्रस्तावात १०.०६ हेक्टर जागेवर २५६ कुटुंबीयांचे फेर पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १०.०६ हेक्टर जागा विकसित करुन देण्यात येणार आहे. या विकसित करण्यात येणाऱ्या जागेमध्ये ६,९,१२ मीटर रुंदीचे रस्ते तयार करण्यात येणार आहेत.तयार करण्यात आलेला आराखडा टाऊन प्लॅनिंग विभागाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. या जागेची मालकी जेएनपीटीकडे असली तरी प्लानिंग थोरिटी सिडको आहे. त्यामुळे टाऊन प्लॅनिंग विभागाच्या मंजुरीनंतरही आराखड्याला सिडकोची मंजुरी आवश्यक असल्याने मंजुरीसाठी सिडकोकडे पाठविण्यात येणार आहे.

आतापर्यंतच्या काळावधीतील १०.०६ हेक्टर विकसित जागेचा हा बेस्ट प्रस्ताव आहे. या विषयावर बैठकीत ग्रामस्थांशी सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे १०.०६ हेक्टर विकसित जागेच्या या प्रस्तावाला मान्यता देऊन जेएनपीटी समुद्र चॅनल बंद आंदोलनाचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा असे आवाहन उपजिल्हाधिकारी राहुल मुंडके यांनी केले. मात्र बैठकीत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतरही हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी कोणताही निर्णय जाहीर केला नसल्याची माहिती उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे.


मात्र आराखड्यात अनेक त्रुटी आहेत.शिवाय आराखडा मंजुरीसाठी वारंवार टाऊन प्लॅनिंग, सिडको यांच्याकडे पाठवून शासनाने वेळकाढू धोरण अवलंबिले आहे.बैठकीतील चर्चेनंतरही ग्रामस्थांच्या घरांच्या किंमतीबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. सकारात्मक चर्चा झाली असली तरी कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

त्यामुळे आंदोलनाच्या निर्णयावर ठाम असुन आज २६ फेब्रुवारीपासून जेएनपीटी समुद्र चॅनल बंद आंदोलन केव्हाही सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती सरपंच परमानंद कोळी यांनी दिली आहे.

# निरुपणकार सचिनदादा धर्माधिकारी यांना 'युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टीट्यूट'कडून डॉक्टरेट पदवी बहाल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा'च्या निरुपणाचे अलौकिक कार्य करणारे, रायगड भूषण निरुपणकार सचिनदादा धर्माधिकारी यांना 'युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टीट्यूट'कडून मानाची डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली आहे. तर प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा, पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनाही 'लिव्हींग लिजेंड' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टीट्यूटने ज्येष्ठ निरुपणकार डॉ.आप्पा-ासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांना सन्मानित केल्यानंतर रायगडातील सदस्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. निरुपणकार सचिन धर्माधिकारी यांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीसह स्वच्छता अभियान, वृक्ष लागवड, आरोग्य शिबीर, जलसंधारणाचे कार्य, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता आवश्यक असणारे प्रशिक्षण, तलाव-विहिर-धरण गाळ उपसा, ग्रामस्वच्छतेचे उपक्रम राबवत धर्माधिकारी प्रतिष्ठानने मोलाचे कार्य केले आहे.

सर्व उपक्रम राबविताना सचिन धर्माधिकारी हे स्वतः तळागाळापर्यंत जाऊन प्रत्येक कामाचे नियोजन करतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत, युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टीट्यूटने त्यांना 'डॉक्टरेट' बहाल केली. आज (२५ फेब्रुवारी) थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित सोहळ्यात सचिन धर्माधिकारी यांना गौरविण्यात आले.याच कार्यक्रमात ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'लिव्हींग लिजंड' हा देऊन सन्मानित करण्यात आले. या अलौकिक सोहळ्यानंतर रायगडातील श्री सदस्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# कोळगाव येथे अवैधरित्या वाळू उत्खनन करणाऱ्यांवर महसूल विभागाची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यातील कोळगाव समुद्रकिनारी अवैधरित्या वाळू उत्तखनन प्रकरणी चार आरोपीविरुद्ध मांडवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत मांडवा पोलीस ठाण्यात संदीप बाळासाहेब ढमढेरे (वय- ४२ वर्षे, तलाठी सजा धोकवडे, तालुका- अलिबाग) यांनी तक्रार केली आहे. याप्रकरणी एक ब्रास वाळूसाहित रु.१० लाख ६५ हजार ०५७ किंमतीचा मुद्देमाल जप्त जप्त करण्यात आले आहे.

अलिबाग तालुक्यातील धोकवडे सजाअंतर्गत कोळगाव समुद्रकिनारी अवैधरित्या वाळू उत्तखनन करीत असल्याची माहिती तलाठी संदीप बाळासाहेब ढमढेरे यांना मिळाली. तातडीने त्यांनी ही माहिती प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांना कळविली. यावर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी त्यांच्या पथकाला पुढील कारवाई करण्याबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यानुसार किहीम तलाठी विनोद सुखदेव शिंगाडे, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक कोल्हे आणि इतर पो-लीस कर्मचारी यांच्यासाहित कोळगाव गावाच्या समुद्रकिनारी गेले असता तेथे समुद्रावर एक ट्रक, पिकअप जीप, मोटर सायकल, जेसीबी व राजेंद्र लक्ष्मण पाटील, ऋतिक राजेंद्र पाटील (दोघेही राहणार-कोळगाव .../२

# ऑनलाईन सभेचा अजेंडा असताना सभेत अधिकारी व स्थायी समिती सदस्य हे प्रत्यक्ष सभागृहात कसे बसू शकतात

## विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांची कारवाईची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका स्थायी समितीच्या सभेचे सचिव कार्यालयामधून सूचना काढून ऑनलाईन बैठकीला उपस्थित राहण्याच्या सूचना असताना सत्ताधारी पक्षाचे सदस्य ऑनलाईन बैठकीस उपस्थित होते. मुळातच कोविड नियमांचे पालन व्हावे यासाठी सदर स्थायी समिती सभा ही शासन निर्णयानुसार ऑनलाईन घेणे बंधनकारक आहे. असे असताना देखील पालिकेतील स्थायी समिती सभेच्या वेळेची परिस्थिती



पहिली असता पालिकेचे अधिकारी अगदी खुर्ची ला खुर्ची लावून कोविड नियमांचे उल्लंघन करत बाजू बाजूला बसले होते. त्यातच कर म्हणजे महापालिकेचे सभागृह नेते ऑनलाईन सभा असताना तिथे हजर होते.

विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे इकडून तिकडून स्वतः विषयपत्रिकेवरील विषय क्रमांक ३ जो विरोधी सदस्यांचे मत विचारात न-घेता केवळ दडपशाहीने सदर विषय रेटून नेत होते. सभापतींना ऑनलाईन सभेत सातत्यांने आमचे सर्व सदस्य सदर विषयासाठी .../२

# पोलीस मिनीबस घुसली चहाच्या टपरीत ; ४ जखमी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील नागोठणे कोलाड मार्गावरील खांब नजीक पुगाव गावाजवळ व स्टॉपवर असणाऱ्या रुपेश अधिकारी यांच्या चहा च्या टपरीत घुसून हा अपघात घडला असून यातील प्रवास करणारे चार पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले असून मिनीबस सह टपरीचे अतोनात नुकसान झाले आहे.



या बाबत सविस्तर माहिती खांब कडून कोलाड कडे जाणारी पोलीस मिनीबस गाडी क्र. एम. एच.०६ के ९९३० ही शुक्रवारी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता सदरच्या मार्गावरून प्रवास करीत असता यावरील वहान चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात घडला आहे सदर घडलेल्या आपघात घटनेत चार पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर कोलाड आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात ताबडतोब उपचारासाठी हलविण्यात आले.

जखमीचे नाव- पोहवा चव्हाण, पोशि बोरकर, पांचाळ, पांचाळ, दळवे, धुळगडे, चव्हाण, लहारे, मुसळे, शेटकर जखमी झाले आहेत. वरील तारखेस वेळी व ठिकाणी यातील पोलीस मिनी बस क्र एम एच ०६ के ९९३० वरील चाळक संजय अण्णा चव्हाण .../२

## संक्षिप्त...

### ट्रकचे चाक शरीरावरुन गेल्याने ६४ वर्षीय इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ट्रकचे चाक शरीरावरुन गेल्याने ६४ वर्षीय भरत शांतिनाथ आरवाडे यांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

ग्रीन मेडोज सोसायटी, शिरढोण गाव येथील प्रतीक आरवाडे हे आणि त्यांचे वडील भरत आरवाडे एक्टिवा स्कुटी घेऊन निघाले होते. ते त्यांचे काम आटोपून घरी जाण्याकरता निघाले असता मुंबई-गोवा हायवेवर टेक केअर लॉजिस्टिक गेटच्या समोर गोव्याकडे जाणार्या लेन वर शिरढोणच्या दिशेने जात असताना ट्रक वरील चालकाने इशारा न देता ट्रक अचानक डाव्या बाजूला वळवला.

ट्रकचा घसारा कटीवाला लागल्याने दोघेही रस्त्यावर पडले. यावेळी भरत नरवाडे यांच्या शरीरावरून ट्रकचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर प्रतीक आरवाडे हा रस्त्याच्या बाजूला पडल्याने त्याला किरकोळ दुखापत झाली. ट्रक क्रमांक एम एच ४६ एफ २९३३ वरील चालकाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बेकायदेशीर एलईडी, पर्ससीन मासेमारीमुळे गरीब मच्छीमारांच्या पोटावर पाय

## कायदा असून सुद्धा अमलबजावणी न केल्याने एलईडी मच्छिमारांचे फावले





**दै.रायगड नगरी । मुरुड**

संपूर्ण कोकणाला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे या महत्वाच्या अश्या जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात मासेमारी केली जाते. भारताला आर्थिक व्यवस्था मजबूत करण्यासाठी परकीय चलन मिळून देणारा मोठा व्यवसाय म्हणून मासेमारीकडे पहिले जाते. मासेमारीमधून देशाला परकीय चलन मिळत असल्याने मच्छिमारांच्या हक्काचे संरक्षण व्हावे म्हणून एल इ डी व पर्ससीन मच्छिमारी करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. यासाठी विशेष कायदा करण्यात आला परंतु कायदा केला परंतु कठोर कार्यवाही व अमलबजावणी होत नसल्याने स्थानिक मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून सुद्धा शासन या बाबीकडे गांभीर्याने पहात नसल्याने एल इ डी व पर्ससीन मच्छिमारी करणाऱ्यांचे चांगलेच फावले असून खोल समुद्रात अश्या पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांचे चांगले दिवस आले आहेत.

एल इ डी व पर्ससीन मच्छिमारी करणारा पकडला गेला तर प्रथम मत्स्य विभागाकडून त्याच्यावर कार्यवाही केल्यानंतर त्याला तहसीलदार यांच्या समोर उभे केले जाते. तद्नंतर दंड भरल्यावर त्याला मोकळे केले जात असल्याने सदरची कार्यवाही जुजबी स्वरूपात होत असल्याने एल इ डी व पर्ससीन मच्छिमारी करणाऱ्यांचे चांगलेच फावले आहे.

मत्स्य विभागाकडे खोल समुद्रात मासेमारी एल इ डी व पर्ससीन द्वारे होत असेल तर हा विभाग त्या होड्यांपर्यंत पोहचू शकत नाही. कारण मत्स्य विभागाला शासनाने सक्षम सुविधाच प्रदान करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे खोल समुद्रात बिनदिक्त अशी मच्छिमारी होत आहे. मत्स्य विभागाला स्पीड बोट अथवा इलेक्ट्रोनिक यंत्रणा पुरविणे खूप गरजेचे आहे. परंतु जुजबी सेवेवर अश्या प्रकारावर आळा घालणे आता कठीण होऊन बसले आहे.खोल समुद्रात एल इ डी व पर्ससीन मच्छिमारी करताना सापडले तर होडीवर असणारे साहित्य म्हणजेच एलईडी करताना वापरात येणार जनरेटर मोठ्या विद्युत क्षमतेचे बल्ब याना त्याच ठिकाणी जलसमाधी देण्यात येते म्हणजे मोठ्या वस्तूंचे नुकसान झाले तर पुन्हा कोणी एलईडी मासेमारी करणार नाही. परंतु त्याला किनाऱ्यावर आणून जुजबी कार्यवाही मुळे या प्रकारावर नियंत्रण आणता आलेले नाही.

एलईडी आणि पर्सनीन मासेमारीमुळे दालदी आणि तत्सम पारंपारिक मच्छिमारांना मासळी मिळणे अवघड झाले आहे. हूक पद्धतीने कुपा मासळी पकडण्याची पद्धत जुनी आहे.; मात्र पाश्चात्य पद्धतीने नव्या तंत्राने समुद्रात पर्सनीन आणि एलइडी जाळी आणि गळ टाकून शेकडो कुपा मासळी .../२

# पुढील दासनवमीस श्रीक्षेत्र रामदास पठारला पर्यटन विकासाचा शुभारंभ : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

श्रीक्षेत्र रामदासपठार येथील तीर्थक्षेत्र व पर्यटनविकासाचे काम येत्या काळात निश्चितच सुरू करण्यासाठी पुर्णपणे प्रयत्न करण्यात येतील. समर्थ रामदासस्वामींच्या कृपाशिर्वादाने कोणतेही विघ्न न उदभवल्यास पुढील दासनवमीला पर्यटन विकासाचा खऱ्या अर्थाने शुभारंभ होईल, असे सावध आश्वासन रायगडच्या पालकमंत्री ना. अदिती तटकरे यांनी दिले.

समर्थ रामदासस्वामी यांच्या पुण्यतिथीदिनी दासनवमीनिमित्त श्रीक्षेत्र रामदासपठार येथील कार्यक्रम प्रसंगी श्रीगणेशनाथ महाराज संस्थानचे तपोनिधी अरविंदनाथ, रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अपेक्षा कारेकर, माजी पं.स.सदस्य अमोल कारेकर, तहसिलदार सुरेश काशिद, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष निलेश महाडीक तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

श्रीरामदासस्वामी मंदिर सुंदरमठ याठिकाणी पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्याहस्ते अन्नदान सभामंडपाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री ना.तटकरे यांचा सत्कार माजी राजिप अध्यक्षा अपेक्षा कारेकर यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी तपोनिधी अरविंदनाथ यांनी यावेळी काही भित्तीफलकांचे पुरावे दाखवून समर्थांच्या वास्तव्याचे हेच स्थान असल्याचे नमूद केले.

यावेळी ना.अदिती तटकरे यांनी, .../२






# शेकापचे वजूभाई सादराणी यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल पक्ष कार्यालयात रोज हजेरी ला-वणारा शेकापक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते वजूभाई सादराणी यांचे वयाच्या ७० व्या वर्षी दुःखद निधन झाले.



आता कुठल्याही कार्यक्रमात व पार्टी ऑफिसला हरी ओम नामाचा गजर थांबला. वजुभाई यांच्याकडून पनवेल नगरपालिका व विधानसभा हद्दीतील खुप काही किस्से ऐकायला मिळाले व मिळत होते परंतु आज ही दुःखद बातमी ऐकून कुठेतरी काळजाला धक्का बसला. एक जेष्ठ आणि वयाच्या ७० मध्ये सुद्धा पक्षाविषयी व संघटनेविषयी आणि अगदी नेत्यांच्या विषयी आदर करणारे व नेहमी विचारपूस करणारे आमचे जेष्ठ मार्गदर्शक आज आपल्या सर्वांच्या मधून निघून गेले आहेत. त्यांच्या जाण्याने शेकापक्षाचा पुरोगामी विचारांचा प्रसार आणि प्रचार थांबला.



श्रीवर्धन तालुक्यातील सर्वे येथील मुस्लिम बांधवांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेनेचे आमदार भरतशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी आनिल नवगणे, श्यामकांत भोकरे, तुकाराम सुर्वे, प्रमोद घोसाळकर, सुजित तांदळेकर, बाबूराव चोरगे, प्रतोष कोलथळकर, संदेश म्हसकर, सुजित शिंदे, आविनाश कोळंबेकर आदी पदाधिकाऱ्यांसह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

# १ लाख ८६ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इन्शुरन्सला सिक्युरिटी देऊन कमी पैशात प्रोटेक्शन देऊ असे सांगून क्रेडीट कार्डची डिटेल घेतली आणि ३२ वर्षीय इसमाची १ लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर १४, तळोजा फेस वन येथील मनीष भास्कर पाटोळे यांना एका महिलेने फोन करून एसबीआय बँकेतून बोलत असल्याचे सांगितले. आणि तुमच्या इन्शुरन्सला सेक्युरिटी देऊन कमी पैशात प्रोटेक्शन देतो असे सांगितले. त्यानंतर क्रेडिट कार्ड ची डिटेल मागून मोबाईलवर आलेला ओटीपी विचारण्यात आला.

पाटोळे यांनी ओटीपी दिल्यानंतर त्यांच्या क्रेडिट कार्डमधून एक लाख ८५ हजार ८४० रुपये वजा झाले. त्यानंतर तुमच्या अकाउंटला उद्या पैसे येऊन जातील असे त्या महिलेने सांगितले आणि फोन कट केला. अनोळखी महिलेने फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.



नागरिकांना भेडसवणाऱ्या समस्या जाणून त्या सोडवण्याचे काम पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून सुरु आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक १९ मधील एस.टी.स्टँड जवळील गटारांची पाहणी केली होती. या कामांना सुरुवात झाली असून, सभागृहनेते परेश ठाकूर यांनी या कामाची पाहणी करुन आवश्यक त्यासूचना दिल्या. तसेच मिडलकलास हौसिंग सोसायटीमधील रस्ते आणि गटाराची अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली.


मा.गोडसे मॅडम कोर्ट

अर्जदारतर्फे वकील श्री.एन.बी.पावशे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.२०९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०३/२०२२

१) श्रीमती.निर्मला गजानन वाजेकर (पत्नी)
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रकाश गजानन वाजेकर (मुलगा)
वय : ४० वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.आकाश गजानन वाजेकर (मुलगा)
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
क्र.१ ते ३ रा.मु.ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.रुपाली संजय भोईर (विवाहित मुलगी)
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.गजानन जोमा वाजेकर हे दि.१९/०६/२०२१ रोजी सुरज हॉस्पिटल, सानपाडा, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.गजानन जोमा वाजेकर, यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.गजानन जोमा वाजेकर यांच्या सामाईक मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | ५४/७ | ०-१४-० | १.४७ |
| २ | ४९/७ | ०-२२-५० | ३.३८ |
| ३ | ४९/९ | ०-४८-८० | ११.७० |

वरील अर्जदाार हे मयत कै.गजानन जोमा वाजेकर यांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.गजानन जोमा वाजेकर यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२५/०२/२०/२०२२ रोजी माझी, सही न्यायलयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे मॅडम कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.जान्हवी वाडकर-गोगटे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१६८३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०४/२०२२

१) अस्मिता दत्तात्रय ठाकूर
उ.व.३९, व्यवसाय : गृहिणी
रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
२) आदित्य दत्तात्रय ठाकूर
उ.व.१२, व्यवसाय : शिक्षण
रा.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
३) आयुष दत्तात्रय ठाकूर
उ.व.१४, व्यवसाय : शिक्षण
अर्जदार क्र.१ स्वतःसाठी व अर्जदार क्र.२ व ३ ची
अज्ञान पालनकर्ती म्हणून
४) तारा पांडुरंग ठाकूर
उ.व.६८, व्यवसाय : गृहिणी
रा.लोणघर, ता.अलिबाग, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. दत्तात्रेय पांडुरंग ठाकूर हे दि.२१/०६/२०२१ रोजी मयत झाल्याने अर्जदार यांनी कै.दत्तात्रेय पांडुरंग ठाकूर यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिकेचे हद्दीतील मौजे : पडघे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मालमत्ता क्र.३५९ (क्षेत्र १०४ चौ.फुट)**

अर्जदार हे कै.दत्तात्रेय पांडुरंग ठाकूर यांच्या वरील मिळकतीस कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.दत्तात्रेय पांडुरंग ठाकूर हिच्या वारसपत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस खुलासा

दि.२०/०२/२०२२ रोजीच्या दै.किल्ले रायगडमध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसीबाबत खुलासा असा की,

आमचे अशिल मे.सिटी डेव्हलपर्स तर्फे श्री.अस्लम अ.म.मुन्शी यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरुन आणि दिलेल्या सुचना वरुन सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येते की,

तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांना ज्युईश सिमेटरी ट्रस्ट पनवेल यांनी सन ३१/०५/२०१६ रोजी कुलमुखत्यारपत्र देवून पनवेल येथील अंतिम भूखंड क्र.२१७ विकसन करणेबाबत करार केलेला आहे. त्यानुसार आमचे अशिल यांनी सुमारे २ कोटी ९६ लाख (दोन कोटी श्यहाण्णव लाख) खर्च करून विकासकाम केलेले आहेत. सदर काम करत अताना ज्यु समाजाचे काही लोक काम बंद करत होते व आहेत. त्यामुळे आमचे अशिलांचे मोठे नुकसान झाले आहे व होत आहे. तरी आमचे अशिल विकसन कराराची पुर्तता करण्यास तयाार होते व आाहेत.

अशा परिस्थितीत दि.३१/०५/२०१६ रोजीचा करार आणि कुलमुखत्यार एकतर्फी रद्द करणे बेकायदेशीर व अन्यायकारक आहे. तरी या खुलाश्याद्वारे तमाम लोकांना आणि ज्युईस सिमेटरी ट्रस्ट पनवेल पदाधिकारी यांना कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.सिटी डेव्हलपर्स तर्फे अस्लम अ.म.मुन्शी यांचे सोबत ज्युईस सिमेटरी ट्रस्ट यांनी केलेला विकसन करार आणि कुलमुखत्यार रद्द झालेले नाही, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.किशोर एम. केंडे**
**फ्लॅट नं.३, श्रावण को.ऑ.हौ.सो., प्लॉट नं.१८, माथेरान रोड, सेक्टर १२, नवीन पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९२२६६५०२०१**



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री.धिराज पांडुरंग पाटील, २) श्री.शरद पांडुरंग पाटील, ३) श्री.सचिन कोंडीराम वालीलकर खालील वर्णनाची जमीन मिळकत तीचे मालक १) श्री.अशोक सदानंद फराड, २) श्री.राकेश नामदेव फराड, ३) श्री.संजय सदानंद फराड, ४) सौ.शुजाता संजय फराड, रा.डोणे, पो. वांगणी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे यांचेशी चर्चा करून सदरची मिळकत कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पाषाणे, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १४८ (जुना २१५/३) | ३/ब | ०-१७-०<br>पो.ख.०-०३-०<br>एकूण क्षेत्र ०-२०-० | ०.१८ |

याप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदर मिळकतीबाबत कोणाही व्यक्तींचे गहाण, दान, लीज, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क, वहिवाटीचे हक्क, ताबा-कब्जा, भाडेपट्टा, कोणत्याही बोजा वा अन्य कोणतेही हक्क व हितसंबंध असल्यास अथवा आमचे अशिल सदर मिळकतीचे करत असलेल्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्तीने अथवा संस्थेने आपली हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी पोस्टामार्फत अथवा स्वतः हजर होवून सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. सदर नोटीस कालावधीनंतर व विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीत कोणाचाही हक्क व हितसंबंध व हरकत नाही असे समजून सदर मिळकतीचे आपल्या लाभांत खरेदीखताचा व्यवहार नोंदणीकृत करून सदरचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मागाहून येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२५/०२/२०२२

**सही/-**
**ॲड.किशोर बी. करावकर**
**रा.रुम नं.३०३, जगन निवास, प्लॉट नं.२३७, सेक्टर-आर-३, कोल्ही, पुष्पक नगर, वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## कोळगाव येथे अवैधरित्या वाळू उत्खनन करणाऱ्यांवर महसूल विभागाची धडक कारवाई

-अलिबाग), अशोक काशीनाथ चव्हाण (वायशेत-अलिबाग), अर्जुन रामचंद्र कोळी (मांडवा-अलिबाग) हे जेसीबीच्या साहाय्याने समुद्राची वाळू ट्रक मध्ये भरत असताना सापडले. त्यांच्याकडे पथकाने वाळू उपसाच्या परवान्याबाबत विचारणा केली. त्यांनी त्यांच्याकडे परवाना नसल्याबाबत सांगितले. यावेळी त्यांच्याकडून रु.०३ लाख ०५ हजार ५७/-किंमतीचा एक टाटा टेम्पो, रु.१ लाख ५० हजार किंमतीचा महेंद्र कंपनीचा पिकअप, ५लाख ५० हजार किंमतीचा एक जेसीबी असा एकूण रु.१ लाख ६५ हजार ५७ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत मांडवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रभारी पोलिस निरीक्षक राजीव सर्जेराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

## अधिकारी व स्थायी समिती सदस्य हे प्रत्यक्ष सभागृहात कसे बसू शकतात

मतदान घ्यावे ही विनंती करत असताना सभापती मात्र सभागृहात उपस्थित सदस्याच्या म्हणण्या प्रमाणे सदर विषय मंजूर अश्या प्रकारची घोषणा करत होते. पटलावरील पुढील विषय क्र.४ व ५ ते देखील आमचे कोणतेही मत विचारात न-घेता विषय मंजूर करून घेतले. विषय क्र.३ हे मतास घ्यावे हे सांगण्यासाठी मी व माझे सहकारी स.स.गणेश कडू आम्ही सभागृहात प्रवेश केला असता वर उल्लेखलेली परिस्थिती सभागृहात आम्हास पहावयाला मिळाली. याचा जाब मी विरोधी पक्ष नेता म्हणून सन्मानीय उपायुक्त सचिन पवार यांना विचारला असता सदर विषयात ऑनलाईन सभेत सदस्याला बोलावून सभागृहात बसायला देणे हे सभापतींचे अधिकार आहेत अशा प्रकारचे उत्तर दिले.

तरी ऑनलाईन सभेचा अजेंडा असताना सभेत अधिकारी व स्थायी समिती सदस्य हे प्रत्यक्ष सभागृहात कसे बसू शकतात? वरील विषयाबाबत उपायुक्तांनी सांगितल्याप्रमाणे सभापतींच्या अधिकाराचा शासन निर्णय असेल तर माहितीसाठी मला द्यावा. अन्यथा शासन निर्णय तोडून प्रत्यक्ष उपस्थित असणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी. असे प्रितम जनार्दन म्हात्रे, विरोधी पक्ष नेता पनवेल महानगरपालिका यांनी म्हटले आहे.

## पोलीस मिनीबस घुसली चहाच्या टपरीत ; ४ जखमी

पोहवा रा. गोरेगाव ता. माणगाव यांनी आपल्या ताब्यातील वाहन खांब बाजूकडून माणगाव बाजूकडे मुंबई-गोवा हायवे रोड वर चालवून घेऊन जात असताना मिनी बस रोडच्या साईडला जाऊन सद्गुरु चहा टपरीत घुसून बाजूला असलेल्या नारळाच्या झाडास ठोकर मारून अपघात झाला.

सदरच्या घटनेची माहिती मिळताच कोलाड पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व्हिजिट मार्गदर्शन विभागाचे ए एल पोसई श्री घायवट यांनी घटनास्थळी भेट देत घटनेची मो.अ. न. २/२०२२ नोंद करत अधिक तपास करत आहेत.

## बेकायदेशीर एलईडी, पर्ससीन मासेमारीमुळे गरीब मच्छीमारांच्या पोटावर पाय

पकडली जात आहे. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांना मासळीचा मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. समुद्रात रात्री मोठ्या विद्युत प्रकाशात मासळीला आकर्षित करून केलेली एलईडी मासेमारीमुळे पारंपरिक मच्छिमारांना समुद्रात मासळी मिळत नसल्याने बहुतांश नौका मुरूड, एकदरा समुद्र खाडीत नांगरण्यात आल्या आहेत. बेकायदेशीर मासेमारीवर कोणी कारवाई करायची या बाबत सुसुत्रता नसल्याने चालढकल केली जात आहे. त्यामुळे कडक कारवाई कधी आणि कोण करणार याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.अशा बेकायदेशीर मासेमारीवर त्वरित निर्बंध शासनाने आणून न्याय द्यावा अशी मागणी बेजार झालेल्या कोकणातील मच्छिमारांकडून शासनाकडे मागणी केली जात आहे. मुरूड मासळी मार्केट मध्ये मासळीची आवक घटल्याने कोलंबी आणि सुरमई, रावस अशी मासळी शिवाय दुसरी मासळी अभावानेच दिसून येत आहे.अशा परिस्थितीत पारंपरिक मच्छिमारांचे जीवन असह्य बनले आहे.मासळी मार्केट मध्येच कमी प्रमाणात मासळी येत असल्याने मासळीचे दर सुद्धा गगनाला भिडले आहेत. पांडुरंग नांग्या थोकजी, माया वाघरे, अरुण मढवी, अरुण झुजे,उद्देश गंबास, रोहन निशानदार, प्रमोद गंबास यांनी सांगितले की,एलईडी आणि पर्सनीन मासेमारीमुळे दालदी आणि तत्सम पारंपारिक मच्चीमारांना समुद्रात मासळी मिळणे अवघड झाले आहे. कोळी महासंघाचे महाराष्ट्र राज्याचे युवा अध्यक्ष व महाराष्ट्र मच्छिमार भाजप प्रणित सेलचे अध्यक्ष ॲड चेतन पाटील यांनी सांगितले कि, एल इ डी, पर्ससीन करणाऱ्या या ९५ टक्के होड्या अवैध्य असून त्यांच्याकडे स्वतःची लायसन्स सुद्धा नाही आहेत.फिशीरीज विभाग व मंत्र्यांच्या कृपा आशीर्वादाने सदरची मच्छिमारी बेधडक सुरु आहे.पर्ससीन मच्छिमारी करणाऱ्यांकडे केवळ ५ टक्के लोकांकडेच लायसेन्स आहेत.त्यांना नोव्हेम्बर ते जानेवारी पर्यंतच मच्छिमारी करण्याची परवानगी आहे.जर हि अवैध्य मासेमारी थांबवायची असेल तर किनाऱ्यावरूनच बोटींवर कार्यवाही होणे गरजेचे आहे.एल इ डी, पर्ससीन करणारी बोट सापडली तर ती बोट कायम स्वरूपात जप्त करण्यात आली पाहिजे तरच अवैध्य मासेमारी करणाऱ्यांवर धाक निर्माण करता येणार आहे.पारंपरिक मासेमारी करणाऱ्यांवर मोठे संकट लक्षात घेऊन कडक कार्यवाही फिसिरीज व राज्य सरकारकडून होणे क्रमप्राप्त आहे.

संपूर्ण कोकण विभागात एकूण १५३ मच्छिमार सहकारी संस्था असून ८६३४ मासेमारी नौका आहेत. हजारो जणांचे कुटुंबीय, संसार पारंपरिक मासेमारी वर अवलंबून आहेत.आठ ते दहा दिवस खोल समुद्रात जाऊन सुद्धा मासळी मिळत नसेल तर आमचे मच्छिमार कर्जबाजारी होणार आहेत.राज्य शासनाने या बाबीकडे गांभीर्याने पहावे एल इ डी, पर्ससीन द्वारे मच्छिमारी करणाऱ्यांवर कठोरातली कठोर कार्यवाही होणे खूपच गरजेचे आहे.मच्छिमारांना वेळीच वाचवा जर दुर्लक्ष केलेत तर आमचे बांधव कर्जाच्या बोज्याने दबून जाऊन आत्महत्या सुद्धा करू शकतात.अशी शक्यता हनुमान मच्छिमार सोसायटीचे चेरमन व मुरूड तालुका मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष पांडुरंग आगरकर यांनी व्यक्त केली आहे.

## पुढील दासनवमीस श्रीक्षेत्र रामदासपठारला पर्यटन विकासाचा शुभारंभ : ना.आदिती तटकरे

आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव घेतो तेव्हा आपले ऊर अभिमानाने भरून येते. मी रायगडची लोकप्रतिनिधी असल्याने दिल्लीच्या तख्तापर्यंत त्याचा अभिमान असल्याचे सर्वांच्या नजरेतून आपणास पाहण्यास मिळते. पुढीलवर्षी या दासनवमीच्या दिवशी जमू तेव्हा आपण मागणी केलेल्या तलावाच्या कामाची सुरूवात झाली असेल. खासदार तटकरे साहेबांना उपस्थित राहणे जमले नसले तरी खा.तटकरे यांच्यावतीने त्यांची कन्या म्हणून मी शब्द देत आहे, असे यावेळी सांगितले. कार्यक्रमस्थळी महाडचे डीवायएसपी निलेश तांबे यांनी पोलीसकर्मीसमवेत कार्यक्रमाच्यापूर्वी पालकमंत्री ना.तटकरे यांच्याकडून पाहणी होणार असलेल्या तलावाच्या परिसराची स्वतः पाहणी केली. या कार्यक्रमप्रसंगी अनेक स्थानिक निमंत्रित लोकप्रतिनिधींची उपस्थिती तसेच व्यासपिठावरील फलकावर नामोल्लेख अथवा चित्र नव्हते.

# बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानांतर्गत शासनाने दिलेली उद्दिष्टे सर्वांनी मिळून पूर्ण करूया : रुबल अग्रवाल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानांतर्गत महिला व बालविकास क्षेत्रात काम करण्याची आपल्या सर्वांना उत्तम संधी मिळाली आहे. या संधीद्वारे शासनाने दिलेली उद्दिष्टे सर्वांनी मिळून पूर्ण करूया, असे आवाहन एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त रुबल अग्रवाल यांनी आज येथे केले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, आशा सेविका तसेच महिला व बालविकास विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी जिल्हास्तरीय पोषण अभियान व बेटी बचाओ..बेटी पढाओ कार्यशाळेचे आयोजन जिल्हा नियोजन भवन येथे करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी रायगड जिल्हाधिकारी तथा पोषण अभियान अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी नितीन मंडलिक, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विनित म्हात्रे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अशोक पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा ग्रामीण विकास आरोग्य यंत्रणेच्या प्रकल्प संचालक डॉ.ज्ञानदा फणसे, शिक्षणाधिकारी ज्योती शिंदे-पवार, स्वदेश फाऊंडेशनचे जिल्हा व्यवस्थापक तुषार इनामदार, बालविकास प्रकल्प अधिकारी चेतन गायकवाड, अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स आदी उपस्थित होते.

यावेळी एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त श्रीमती रुबल अग्रवाल यांनी सर्वप्रथम जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे त्यांनी या कार्यशाळेसाठी स्वत:हून पुढाकार घेतल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच पोषण आहार उत्कृष्ट सहभागाबद्दल रायगड जिल्ह्याचा पहिला क्रमांक आल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले व त्या पुढे म्हणाल्या की, बेटी बचाओ..बेटी पढाओ या अभियानांतर्गत काम करणे, ही महिला व बालके यांच्यासाठी काम करण्याची उत्तम संधी आहे. मुलींचा जन्मदर आणि गर्भ लिंग तपासणीबाबत आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. रायगड जिल्ह्याचा मुलींचा जन्मदर अत्यंत समाधानकारक आहे. १००० मुलांच्या मागे ९४९ वरून ते हे प्रमाण ९७७ झाले आहे, ही बाब कौतुकास्पदच आहे. हे प्रमाण अधिक होण्यासाठी प्रयत्न करूया. दि.१ मार्च ते १५ ऑगस्ट या कालावधीत कुपोषणमुक्त जिल्हा हे अभियान काटेकोरपणे नियोजन करून यशस्वी करायचे आहे.


## खोपोली नगरपरिषद, पाणी पुरवठा विभाग

**खुली ई-निविदा सुचना क्र.**

**(केएमसी/बांध/४१०२ दिनांक २४/०२/२०२२)**

मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषदेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणे या कामाकरिता इच्छुक तांत्रिक सेवा पुरविणाऱ्या संस्था कंन्सलटंट, आर्किटेक्ट एजन्सीज, यांचेकडून द्विनोंद लिफाफा पद्धतीने सिलबंद ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**कंन्सलटंट, आर्किटेक्ट एजन्सी, तांत्रिक सेवा पुरविणाऱ्या संस्था यांनी महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६/मंत्रालय मुंबई यांचेकडील दि.४/६/२०१८ चे अवलोकन करूनच या शासन निर्णयानुसार ठरवून दिलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे मर्यादेत भरणेत आलेले दर ग्राह्य धरण्यात येतील.**

सदर कामाची निविदा, अटी व शर्ती, तपशिलासह http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२५/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपलब्ध होईल. निविदा प्रणाली बाबतची काही शंका असल्यास खालील फोन नंबरवर संपर्क साधावा. खोपोली नगरपरिषद, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड दूरध्वनी ०२१९२-२६२२२२/२६३३५६

**सही/-**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**खोपोली नगरपरिषद**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माणगाव येथे ट्रॉमा केअर युनिट उभारण्यास शासनाची मान्यता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील शासकीय आरोग्य यंत्रणा सुसज्ज असणे महत्त्वाचे आहे. सर्व प्रकारच्या आत्याधुनिक आरोग्य सुविधा जिल्ह्यात उपलब्ध करण्यासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे कायम आग्रही असतात. रायगड आरोग्य सुविधा संपन्न होण्यासाठी माणगाव येथे ट्रॉमा केअर युनिट उभारण्यास शासनाची मान्यता मिळाली आहे. रायगड जिल्हा आरोग्यदायी होण्यासाठी पालकमंत्री यांनी केलेल्या प्रयत्नांना आणखी एक यश मिळाले आहे.

लोकसंख्येवर आधारित राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यानुसार रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती असलेल्या माण-गाव तालुक्यात येथे ट्रॉमा केअर यूनिट उभारणे गरजेचे होते. कोकण रेल्वे, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, पुणे-ताम्हिणी-माणगाव-दिघी हा राष्ट्रीय महामार्ग, रेवस-रेड्डी सागरी महामार्ग अशा महत्त्वाच्या वाहतुकीचे केंद्र म्हणून माणगाव तालुका महत्त्वाचा आहे. जिल्ह्यातील औद्योगिकीकरण व पर्यटन यामुळे या भागातील नागरिकीकरणात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाहतुकीदरम्यान होणारे रस्ते अप-घात, औद्योगिक क्षेत्रातील अपघात, महापूर, चक्रिवादळे यांसारख्या नैसर्गिक आपत्ती यांचे प्रमाणही अलिकडच्या काळात वाढत असल्याचे दिसून येते. वातावरणीय बदलांमुळे उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती, रस्ते अपघाताप्रसंगी रुग्णांच्या बचावासाठी अतिमहत्त्वाच्या कालावधीत अत्यावश्यक आरोग्यसेवा मिळण्यासाठी ट्रॉमा केअर युनिट जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी कार्यरत असणे गरजेचे आहे. त्यासाठी माणगाव येथे ट्रॉमा केअर युनिट उपलब्ध होण्यासाठीची विनंती जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी सार्वजनिक अरोग्य मंत्री श्री.राजेश टोपे यांच्याकडे केली होती.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पनवेलपासून सुमारे ११० कि.मी. अंतरावर असलेल्या माण-गाव उपजिल्हा रुग्णालयाची १०० इतकी बेड क्षमता आहे. नियोजित ट्रॉमा केअर युनिटमुळे गंभीर दुखापत झालेल्या रुग्णांना तातडीची वैद्यकीय मदत व सुविधा मिळणे आता शक्य होणार आहे.

कोकण रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गामुळे उपलब्ध वाहतुक सुविधांमुळे माणगाव परिसरात नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. शासनाने निश्चित केलेले निकष विचारात घेता लेवल-३ ट्रॉमा केअर युनिटच्या बांधकामासाठी पुरेशी शासकीय जमीन येथे उपलब्ध आहे. आरोग्य यंत्रणा बळकटीकरणासाठी सर्व दृष्टीने अनुकूल अशा या ठिकाणी ट्रॉमा केअर उभारण्यासाठी मिळालेल्या शासकीय मान्यतेमुळे पालकमंत्री कु.तटकरे यांच्या संकल्पनेतील आरोग्य संपन्न-रायगड ही संकल्पना पूर्णत्वास नेणारे एक यशस्वी पाऊल पडल्याचे या निमित्ताने दिसून येत आहे.

# संक्षिप्त...

## कामोठेजवळ स्विफ्ट गाडीला आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सायन - पनवेल महामार्गावर पनवेलकडे जाणार्या दिशेने तळोजा लिंक रोडवरील ब्रिजवर मुंबई कडून पुण्याकडे जाणार्या एका खाजगी स्विफ्ट डिझायर या गाडीला चालू स्थितीत आग लागली होती.

सदर गाडीने अतिशय जलद गतीने पेट घेतला यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही पण गाडीचे संपूर्ण जळून नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच कळंबोली अग्निशमन दलाचे अग्निशमन अधिकारी सौरभ पाटील, अग्निशमन प्रणेता सुनील सोनवणे, ड्रायव्हर दीपक पाटील, फायरमन सुरज पाटील, फायरमन हेमंत वाघमारे, फायरमन संतोष ठाकूर, फायरमन युवराज राठोड यांनी घटनास्थळी जावून आग आटोक्यात आणली.

## सीकेटी विद्यालय व कोमसापच्या वतीने मराठी भाषा दिनाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल आणि कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार २६ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी १२ वाजता चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा दिन साजरा होणार आहे.

मराठी भाषेच्या जडणघडणीत प्रसिध्द साहित्यिक कुसुमाग्रज अर्थात वि.वा.शिरवाडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी म्हणजेच २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन साजरा केला जातो. या दिवशी महाराष्ट्रात विविध साहित्यिक, शैक्षणिक संस्थांच्यावतीने शैक्षणिक, भाषिक, सांस्कृतिक आदी कार्यक्रम-उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्या अनुषंगाने कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखा तसेच चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिन साजरा होणार आहे. हा कार्यक्रम चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या इंदुमती घरत, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची मुरुड तालुका कार्यकारिणी जाहीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या बोर्ली येथे झालेल्या बैठकीत मुरुड तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये तालुका अध्यक्षपदी जनाब अब्दुल मतीन मु.शफी सुभेदार तर उपाध्यक्षपदी सुनील रामचंद्र बलकवडे यांची नियुक्ती करण्यात आल्याबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची बैठक रविवार दि.२० फेब्रुवारी रोजी बोर्ली येथे अब्दुल मतीन सुभेदार यांच्या निवासस्थानी जिल्हाध्यक्ष मारुती कळंबे यांच्या अध्यक्षतेखाली माजी तालुका अध्यक्ष सिताराम ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. सुरुवातीला सर्व उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी जिल्हा व तालुक्यातील शिक्षकांच्या विविध समस्या तसेच शिक्षकांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर सभेत साधकबाधक चर्चा व विचारविनिमय करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची मुरुड कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये तालुका अध्यक्षपदी जनाब अब्दुल मतीन मु.शफी सुभेदार यांची तर उपाध्यक्षपदी सुनील रामचंद्र बलकवडे, सचीवपदी महंमद इम्रान रफिक अहंमद अन्सारी, कार्यालयीन सचिव पदी मुनीर अहंमद सत्तार खान, तालुका कार्याध्यक्ष पदी मोहन रामचंद्र सुडकू, कोषाध्यक्ष पदी मुजम्मिल मुनिर चिलवान यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.



## कोठिंबे शाळेत प्रयोगशाळा व इ लर्निंग वर्गाचे उदघाटन व शिक्षण परिषद संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठिंबे येथे प्रयोगशाळा व इ लर्निंग वर्गाचे उदघाटन व शिक्षण परिषद संपन्न झाली.

कोठिंबे शाळेत शिक्षण परिषद घेण्यात आली. त्यामध्ये कशेळे केंद्राच्या सर्व शिक्षकांनी सहभाग घेतला होता. कोठिंबे शाळेला मुंबई येथील सामाजिक संस्था युनायटेड वे या संस्थेने प्रयोगशाळेचे आवश्यक साहित्य , प्रयोगशाळेसाठी फर्निचर, व ई लर्निंग संच दिले सदर प्रयोग शाळेचे उदघाटन. संस्थेच्या पदाधिकारी कशीष वारीको, संस्थेच्या शिक्षण समन्वयक रुपाली पवार यांच्या शुभ हस्ते तर ई लर्निंग वर्गाचे उद्घाटन कशेळे केंद्राचे केंद्रप्रमुख अरुण पारधी यांच्या हस्ते करण्यात आले.

युनायटेड वे या संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक क्षेत्रात गोरगरिबांच्या मुलांना चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्याचे काम हाती घेतले आहे. प्रयोगशाळे सह ई लर्निंग चा पहिली ते ८ वी चा अभ्यासक्रम, सॅनिटायझर, मास्क दिले. कर्जत तालुक्यात कोठिंबे शाळेसह इतर सहा शाळांना सुद्धा साहित्य पुरविले आहे. भविष्यात सदैव नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबवून शाळेला भौतिक सुविधा मिळवून देण्याचा मानस असल्याचे संस्थेच्या शिक्षण समन्वयक रुपाली पवार यांनी सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापक छगन मेंगाळ यांनी प्रास्ताविकात युनायटेड वे या संस्थेने शाळेला प्रयोशाला व ई लर्निंग वर्गाचे साहित्य देऊन आम्हाला विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मोलाचे सहकार्य केले असे सांगितले तर केंद्रप्रमुख अरुण पारधी यांनी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील बहुतेक भाग हा आदिवासी क्षेत्रात मोडत आहे. दुर्गम भागात शाळा असून सुद्धा शिक्षक इमानेइतबारे काम करत असतात. अनेक संस्थानकडे पाठपुरावा करून शाळेसाठी वस्तूरुपाने मदत मिळवून शाळेचा कायापालट करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढी साठी प्रयत्न शील असतात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देविदास पाटील यांनी केले तर



कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे वरिष्ठ पदवीधर शिक्षक विजय जगताप, अपिनाथ थैल,रिना ऐनकर, शिवकुमार पाटील,बालाजी चौसष्टे,शंकर थोटे आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांची शिक्षण गुणवत्ता वाढीस लागण्यासाठी विविध सामाजिक संस्था पुढे आल्या तर गोरगरिबांच्या मुलांची प्रगती होण्यास कोणतीही अडचण येणार नाही. शिक्षक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मेहनत घेत असतात. पण भौतिक सुविधांअभावी विद्यार्थ्यांची म्हणावी प्रगती होत नसल्याचे मत शाळेचे वरिष्ठ पदवीधर शिक्षक विजय जगताप यांनी व्यक्त केले. केंद्रीय मुख्याध्यापक विश्वनाथ गायकवाड यांनी आभार मानले.

## १६ वर्षीय मुलीवर बलात्कार, दोन आरोपींना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१६ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी दोघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सोयल शब्बीर शेख (वय २१, मोठा खांदा) आणि अर्शद नजीर शेख (वय २५, मोठा खांदा) अशी आरोपींची नावे असून खांदेश्वर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. १६ वर्षीय मुलीच्या बाल वयाचा फायदा घेऊन अर्षद नजीर शेख याने आदई आणि त्याच्या मित्राचा बॅटरीच्या दुकानात नेऊन अत्याचार केला. तसेच याबाबत कुणाला सांगितले तर बदनामी करेन असे पीडित मुलीला सोयल शब्बीर शेख यांनी धमकी दिली. खांदेश्वर पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.


**CHANGE IN NAME**

My old Name was **Jaya Himatlal Shah** As per Gazzete No.(M-21126898), I will be known as **Jayna Himatlal Shah (New Name)** Flat 101, Shree Krupa, Plot No.26, Sector-19, Kamothe, Navi Mumbai-410209

**Jayna Himatlal Shah**
**(Sd/- New Name)**



मा.श्री.सोनवणे साहेब

अर्जदारांतर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर
सौ.निलम विशाल मुंडकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१०२८/२०२१
नि.नं.२५/ड
ने.ता.१५/०३/२०२२

१) कु.मधुरा प्रभुराव केदार
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
२) कु.मानस प्रभुराव केदार
वय : वर्षे, धंदा : नोकरी
दोघेही राहणार : कल्पतरु को.ऑ.हौसिंग सोसायटी,
१२/२, रिस मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड
३) श्रीमती.सरस्वती विलासराव केदार
वय : ७२ वर्षे, धंदा : वयोवृद्ध
राहणार : मु.पो.पालोदी, ता.जि.वाशिम — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी सदर अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील म्हणजेच अर्जदार क्र.३ यांचा मुलगा प्रभुराव विलासराव केदार हे दि.१३/०९/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदार क्र.१ व २ यांची आई ज्योती प्रभुराव केदार या देखील दि.१२/०५/२०१५ रोजी मयत झाल्या आहेत. सदर मयत प्रभुराव विलासराव केदार यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत आहे.

मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड येथील गट नं.१७८, हिस्सा नं.३ पैकी प्लॉट नं.३, क्षेत्र ५०६.३५ चौ.मी. आकार १०-१३ या भूखंडावरील कल्पतरु को.ऑप.हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं.३, २ रा.मजला, फ्लॅट नं.१२, क्षेत्र ६०० स्क्वेअर फुट बिल्टअप. ही सदनिका.

तसेच कै.प्रभुराव विलासराव केदार यांनी त्यांच्या हयातीत त्यांच्या नावे भारतीय जीवन बिगमा निगम मधील जीवन छाया पॉलिसी, शाखा-ठाणे यांचेकडे खालील वर्णनाच्या पॉलिसीज् असून सदर पॉलिसीज् चे वारस (नॉमिनी) म्हणून सदर अर्जदारांची आई मयत ज्योती प्रभुराव केदार यांचे नाव आहे.

| अ.क्र. | पॉलिसी नं. | मिळणारी रक्कम रु.पै. |
|---|---|---|
| १ | ९२१३०७५१५ दि.०५/०५/२००१ | १,००,०००/- |

वर नमूद सदनिका व पॉलिसीचे लाभ अर्जदारांस मिळण्याकरिता अर्जदारांनी ते त्यांनी ते प्रभुराव विलासराव केदार आणि ज्योती प्रभुराव केदार यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२४ माहे २ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे मॅडम कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.मोनिका जी. पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६१७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२१/०३/२०२२

१) श्री.मयुर दशरथ कोकणे
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सी/००२, चंद्रभागा सोसायटी, प्लॉट नं.१४,
सेक्टर ३५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.अंजली संजय पाटील
(पुर्वाश्रमीची निलम दशरथ कोकणे)
वय : ४३ वर्षे, धंदा : काही नाही
रा.टाईप-४, पोलीस अधिकारी कॉटर्स,
एस.व्ही.रोड, कांदिवली पोलीस स्टेशन कंपाऊंड,
कांदिवली, मुंबई-४०००६७
३) सौ.सायली प्रदीप वेस्विकर
(पुर्वाश्रमीची वैशाली दशरथ कोकणे)
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.ब-१०१, सी.एन.एल.पार्क,
प्लॉट नं.३ व ४, एफ.ए.एम.सोसायटी समोर,
से.१२ ब, कोपरखैरणे नवी मुंबई-४००७०९
४) श्री.विशाल दशरथ कोकणे
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
रा.अमोघ हौसिंग सोसायटी, रुम नं.८, २ मजला,
प्लॉट नं.१४, वतन नगर, तळेगाव स्टेशन — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**जिल्हा : रायगड, तालुका : पनवेल येथील फ्लॅट नं.सी-००२, चंद्रभागा सोसायटी, प्लॉट नं.१४, सेक्टर ३५, महालक्ष्मी मॉल जवळ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्र (३१.२२ चौ.मी.)**

कै.सुमन दशरथ कोकणे यांचे तारीख २१/९/२०१४ रोजी जिल्हा : रायगड निधन झाले आहे. अर्जदार यांचे वडील श्री.दशरथ हरिभाऊ कोकणे यांचे यापूर्वीच निधन झाले आहे. कै.सुमन दशरथ कोकणे यांस त्यांचे पश्चात अर्जदार क्रमांक १ ते ४ ही मुले असून असे वारस आहेत. कै.सुमन दशरथ कोकणे यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.सुमन दशरथ कोकणे यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार आल्यास त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.२५/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.के.एम.सोनावणे साहेब

वकील : शशिकांत धनवडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१३५८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०४/२०२२

१) श्रीमती.अलका मारुती आचरे
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) सौ.सोनाली विशाल करपे
पुर्वाश्रमीची सोनाली मारुती आचरे
वय : २८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३) सौ.पुनम अजय माटेकर
पुर्वाश्रमीची पुनम मारुती आचरे
वय : ३० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व रा.सदनिका क्र.डी ३०३, शिवम अपार्टमेंट
सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
भूखंड क्र.४८, सेक्टर १८, कामोठे, नवी मुंबई — अर्जदार

सर्व लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ह्या मयत श्री.मारुती तुकाराम आचरे यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ ह्या मयत श्री.मारुती तुकाराम आचरे यांच्या मुली असून मयत श्री.मारुती तुकाराम आचरे हे दि.०४/०६/२०२० रोजी मयत झाले ओहत.

वरील अर्जदार क्र.१ व २ यांचे पती व वडील मयत श्री.मारुती तुकाराम आचरे यांच्या तसेच मयत श्री.मारुती तुकाराम आचरे व अर्जदार क्रमांक १ यांच्या एकत्रित मालकीची व त्यांच्या नावे असलेल्या मिळकती खालीलप्रमाणेः

**अ) सदनिका क्र.३०३, डी विंग, तिसरा मजला,**
**कामोठे, शिवम अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,**
**भूखंड क्र.४८, सेक्टर १८,**
**कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ ४९० चौ.फुट (सुपर बिल्टअप एरिया)**
**वर नमूद केलेल्या मिळकतीची किंमत रक्कम रुपये २०,००,०००/- (रक्कम वीस लाख मात्र) एवढी आहे.**
**ब) सदनिका क्र.४०४, ए विंग, चौथा मजला,**
**ऑर्चिड प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,**
**सर्व्हे नं.१३, हिस्सा नं.२/२/१/२/२८,**
**मिळकत क्र.१२९५४, मौजे नऱ्हे, तालुका : हेवली,**
**जि.पुणे, क्षेत्रफळ ५४० चौ.फुट या ठिकाणी आहेत.**
**वर नमूद केलेल्या मिळकतीची खरेदी किंमत रक्कम रुपये १०,००,०००/- (रक्कम दहा लाख मात्र) एवढी आहे.**

त्यामुळे त्या अनुषंगाने सदरील मिळकतीमधील मयत श्री.मारुती तुकाराम आचरे यांचा हिस्सा अर्जदार यांच्या नावे हस्तांतरीत करण्यासाठी व मयत श्री.मारुती तुकाराम आचरे यांचे कायदेशीर वारस म्हणून लावण्यासाठी योग्य त्या कोर्टातून त्या बाबतचा वारस दाखला आणल्याशिवाय अर्जदार यांच्या नावाची नोंद वरील मयत श्री.मारुती तुकाराम आचरे यांच्या नावे असलेल्या सदनिका करता येणार नाही असे अर्जारांना सोसायटीच्या सदस्यां व सक्षम कार्यालयाने सांगितले आहे.

ज्याअर्थी अर्जदार पत्नी व मुलगी हे मयत श्री.मारुती तुकाराम आचरे यांचे कायदेशीर वारस या नात्याने वारस दाखला मिळण्याकरिता या न्यायालयात वरील चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तशा आशयाचा वारस दाखला वरील अर्जदारांस देण्यात कोणाही इसमाची काही हरकत असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात.

मुदतीत हरकती न आल्यास अर्जदारास वारस दाखला प्रदान करण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २४/०२/२०२२ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे सो।

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.आर.एल.राऊत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१७०३/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.३१/०३/२०२२

१) श्रीमती.वनिता विक्रम पोळ
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अमोल विक्रम पोळ
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
३) श्री.आशिष विक्रम पोळ
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
४) श्री.आदित्य विक्रम पोळ
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
१ ते ४ रा.बी-३६, रुम नं.१२, सेक्टर ११,
केंद्रीय विहार (३) को.ऑप.हौ.सो.लि., खारघर,
नवी मुंबई, रायगड, महाराष्ट्र-४१०२१० — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी विक्रम शंकर पोळ हे दि.०८/०५/२०२१ रोजी मरण पावले आहेत. व ज्याअर्थी सदर मयत कृष्णा उंदऱ्या भोईर यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे मिळकत आहे.

**SCHEDULE OF PROPERTIES**
**SCHEDULE OF PROPERTY "A & B"**

| Sr. No. | Particulars of Property |
|---|---|
| 1 | Flat owned by **Late Vikram Shankar Pol,** Flat bearing No.G-01, On the Ground Floor, Wing-B in building "Maple" of project "Adhiraj Gardens", Plot No.32, Sector-5, Kharghar, Navi Mumbai, Taluka-Panvel, District-Raigad, valued at Rs.6,08,400/- (Rupees Six Lakhs Eight Thousand Four Hundred Only) |
| 2 | Flat bearing No.Room / Flat No.12, adm. Area B.U.A.-81.59 Sqm., C.A.-57.36 Sqm., Block No.36, Sector-11, Kendriya Vihar (3) Co-op. Hsg. Soc. Ltd., Kharghar, Navi Mumbai-410210., valued at Rs.8,23,907/- (Rupees Eight Lacs Twenty Three Thousand Nine Hundred and Seven Only). |

**SCHEDULE OF PROPERTY "C"**

The amount lying and pending at in SBI bearing Account No.00000051029594037, CIF No.78129610412, MICR Code-400002194, IFSC Code- SBIN0011711, Account Description as "WEALTH S B STAFF" at Pantnagar, Ghatkopar Branch, remaining Balance Rupees Rs. 7,03,216.59/- along with interest till today.

**SCHEDULE OF PROPERTY "D & E"**

| Sr. No. | Register No & Date | Registered Owner's Name | Class of Vehicle | Chassis No. | Engine No. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH46AK8891 10/11/2014 | VIKRAM S.POL | MCYL MOTOR CYCLE | ME4JF392J E7216951 | JF39E70 216980 |
| 2 | MH06AN3049 17/11/2007 | VIKRAM S.POL | MOTOR CAR-NT | MA3EMD81 S00167287 | F10DN3 293544 |

सदर मिळकत अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी कै.विक्रम शंकर पोळ यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता त्याने मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारसदाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२३ माहे फेब्रुवारी सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

